सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो. कॉ. अंबादास किसन गिते,
वय - ३५ वर्षे, धंदा - शेती,
नेमणूक - राहूरी पोलीस स्टेशन.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दिनांक ०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलिस शिपाई म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी मी, पो.ना.तमनर, पो.ना. यादव, पो.कॉ. गुंजाळ पो.कॉ. पालवे असे नेवासा पोलिस स्टेशनला हजर होतो. त्यावेळी पो.नि. क-हे यांनी फोनवर पो. ना. तमनर यांना बातमी दिली की, हारुन युनुस शेख हा हातामध्ये तलवार घेऊन आहे असा फोटो सोशल मिडीयावर व्हायरल झालेला आहे, तरी सदर इसमावर तुम्ही कायदेशीर कारवाई करा. त्यानंतर पो.ना. तमनर यांनी दोन पंचाना पोलीस स्टेशनला बोलवून घेतले. पंचाना बातमीतील हकिगत समजावून सांगितली. पंच आमच्यासोबत येण्यास तयार झाले. त्यानंतर वरील स्टाफ, पंच व मी खाजगी वाहनाने सदर ठिकाणी गेलो. हारुन शेख यांना सोशल मिडीयावर व्हायरल झालेला फोटो दाखवला. त्यावेळी हारुन शेख याने सांगितले की, तलवार मी नेवासा पोलिस स्टेशनला हजर करतो. त्यानंतर हारुन शेख हा नेवासा पोलिस स्टेशनला तलवार घेऊन हजर झाला. पोलिस स्टेशनला त्याला नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव हारुन युनुस शेख, रा, नाईकवाडी मोहोल्ला, नेवासा खु., ता. नेवासा असे सांगितले. पो.ना. तमनर यांनी दोन पंचासमक्ष २.५ लांबीची, ६ इंच मुठ असलेली तलवार जप्त केली. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. पो.कॉ. गुंजाळ यांनी फिर्याद दिली. तलवार मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त तलवार दाखवण्यात आली. ती तिच आहे. तिस एम.ओ.अ देण्यात येते. आरोपीला पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.
सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे.बी. इनामदार यांचेमार्फत सुरु-

२. मी नेवासा पोलिस स्टेशनला ५ वर्ष कार्यरत होतो. घटनेच्या वेळी मी तपास पथकामध्ये पूर्ण नेवासा शहरासाठी कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तपास पथकामध्ये असल्यामुळे मला नेवासा शहराची माहिती होती. नेवासा पोलिस स्टेशन ते नाईकवाडी गल्ली हे अंतर अर्धा कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा पोलिस स्टेशनवरुन घटनास्थळी जाण्यासाठी पाच मिनिटे लागतात. तलवार सोबत बाळगणे हा गंभीर

गुन्हा आहे. कार्यवाही करण्याचे मला तोंडी आदेश होते. ज्या खाजगी वाहनाने आम्ही घटनास्थळी गेलो त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. आम्ही आरोपीच्या घरी गेलो होतो. आरोपीच्या घराचा दरवाजा पुर्व बाजूस आहे. आरोपीच्या घरासमोर झाड नाही. आरोपीचा तलवारी सोबतचा फोटो कोणत्या मोबाईलमध्ये आला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पुर्वीपासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शांतता कमिटीचे सदस्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नाटकामध्ये कार्यक्रमात तलवार वापरली जाते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला मजकुर खोटा सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशी तलवार बाजारात कुठेही मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.</u>

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- ०८/१२/२०२५.